## दिनांक ०५/११/२०२० रोजी मा. जिल्हाधिकारी गोंदिया यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या जिल्हा निर्यात प्रचालन समिती सभेचे इतिवृत्त

दिनांक ०५/११/२०२० रोजी मा. जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालय, गोंदिया येथे दुपारी १२.०० वाजता जिल्हा निर्यात प्रचालन समितीची सभा घेण्यात आली. सभेत खालीलप्रमाणे अधिकारी व औद्योगिक संघटनांचे प्रतिनिधी हजर होते.

१. श्री. उदय खर्डेनविस, ,व्यवस्थापक, जिल्हा अग्रणी बँक,गोंदिया
२. श्री. निरज जागरे, डी डी एम नाबार्ड, गोंदिया
३. कुमारी कावेरी साळे, तंत्र अधिकारी (प्रतिनिधी) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी,गोंदिया
४. श्रीमती जयश्री शेटे, जी एस टी कार्यालय, गोंदिया
५. श्री. हुकुमचंद अग्रवाल,अध्यक्ष, एम आय डी सी इंडस्ट्रि असो. गोंदिया
६. श्री. गजानन अग्रवाल,अध्यक्ष, लाख इंडस्ट्रि असो. गोंदिया
७. श्री. प्रद्युम्न बजाज, बजाज केमीकल इंडस्ट्रि, निर्यातदार, गोंदिया
८. श्री. आशिश अग्रवाल, व्यंकटेश राईस मिल, निर्यातदार, गोंदिया
९. श्री. एच.के.बदर, महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र,गोंदिया
१०. श्री.आर.एन.पाटील,व्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र,गोंदिया

याशिवाय श्री. संभाजी चव्हाण, जाइन्ट डायरेक्टर जनरल फॉरेन ट्रेड,नागपूर व श्री .प्रविण नलावडे, डेप्युटी डायरेक्टर जनरल फॉरेन ट्रेड पुणे. हे गुगल मीट द्वारे ऑनलाईन सभेस उपस्थित होते.

सभेचे सुरुवातीस महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र,गोंदिया. यांनी शासन निर्णय दिनांक १९/१०/२०२० नुसार वाजता जिल्हा निर्यात प्रचालन समिती गठीत करण्याचे उद्येशाविषयी प्रस्तावना केली.

त्यानंतर श्री. संभाजी चव्हाण, जाइन्ट डायरेक्टर जनरल फॉरेन ट्रेड ,नागपूर यांनी निर्यात वाढविण्याचे दृष्टिने उपस्थितांना मार्गदर्शन केले. त्यामध्ये त्यांनी जिल्हयातील निर्यातक्षम उत्पादने ओळखून ३१ डिसेंबर २०२० पूर्वी कृती आराखडा तयार करण्याची सुचना केली. तसेच निर्यात उत्पादकांना प्रोत्साहीत करण्याकरिता प्रशिक्षण व चर्चासत्र आयोजित करण्याची सुचना केली.

त्यानंतर श्री .प्रविण नलावडे, डेप्युटी डायरेक्टर जनरल फॉरेन ट्रेड,पुणे.यांनी निर्यात वाढीसाठी कृती आराखडया अंतर्गत करावयाच्या बाबींविषयी माहिती दिली. त्याअंतर्गत त्यांनी निर्यात संबंधित राज्य व केंद्र शासनाचे विभागांनी त्यांचे विभागामार्फत आलेल्या योजना व प्रोत्साहने व निर्यात संबंधि माहीती १५ दिवसांचे आंत पुरविण्याची सुचना केली.

श्री. निरज जागरे, डी डी एम नाबार्ड यांनी तांदूळ शिवाय तांदळावर प्रक्रिया करुन इतर खाद्य उत्पादने तसेच फळे व भाजीपाला यांची निर्यात वाढविण्याचे दृष्टिने शेतकरी उत्पादक कंपन्या व शेतक-यांचा सहभाग वाढविण्याची सुचना केली. तशीच सुचना कृषि विभागचे प्रतिनीधी कुमारी कावेरी साळे यांनी केली.

अग्रणी बँक, व्यवस्थापक श्री. उदय खर्डेनविस यांनी निर्यातदारांना ५% व्याजदर प्रोत्साहनाची जी EPC अंतर्गत योजना आहे त्याचा कालावधी डिसेंबर २०२० अखेरपर्यंत आहे ती वाढविण्याची गरज प्रतिपादन केली.

त्यानंतर औद्योगिक संघटनांचे प्रतिनिधी व निर्यातदार यांचे अडी-अडचणी विषयी खालीलप्रमाणे चर्चा करण्यात आली.

**वाहतुक खर्च कमी करणे-** एम आय डी सी इंडस्ट्रि असोसिएशनचे अध्यक्ष श्री. हुकुमचंद अग्रवाल यांनी गोंदिया जिल्हयातून मोठया प्रमाणावर तांदूळ निर्यात होत असल्याचे सांगितले परंतु ICD नागपूर येथे असल्याने वाहतूकीसाठी मोठया प्रमाणावर खर्च होतो त्यामुळे निर्यातवाढीचे दृष्टिने तो खर्च कमी करण्यास गोंदिया येथे ICD ची आवश्यकता असल्याचे सांगीतले .

**निर्यात वाढीस प्रोत्साहनाची गरज** :- लाख इंडस्ट्रि असोसिएशनचे अध्यक्ष श्री. गजानन अग्रवाल यांनी लाख उत्पादित वस्तुंची निर्मीती विषयी दिली तसेच या निर्यातवाढीसाठी शासनाने कमी व्याज दरावर वित्त पुरवठयाची गरज असल्याचे सांगितले . श्री. हुकुमचंद अग्रवाल यांनीही MEIS (Mechandic Export India Scheme) अंतर्गत ५% निर्यात् प्रोत्साहन शासनातर्फे देण्यात यावे असे सांगीतले .

**GST परतावा विलंब** – निर्यातदारांनी GST परतावा मिळण्यास विलंब होत असल्याचे सांगीतले त्यावर GST कार्यालयाचे प्रतिनिधी श्रीमती जयश्री शेटे यांनी पोर्टलसंबंधी अडचणी होत्या, परंतु आता नविन पोर्टल विकसीत झाल्याने निर्धारित वेळेत म्हणजे ४५ दिवसांचे आत परतावा मिळेल असे सांगीतले .

Authorised
**~~Audiated~~ Dealer Code अडचणी** - निर्यातदारांनी . AD Code नोंदणी फक्त बँक ऑफ इंडिया येथे उपलब्ध असल्याचे सांगीतले तर इतर बँकेचे बाबतीत नागपूर येथे संपर्क करावा लागतो . त्यावर व्यवस्थापक, जिल्हा अग्रणी बँक यांनी SME चे पोटेंशिअल पाहून बँका त्यांचे शाखेत ती व्यवस्था करतात त्यामुळे सध्या फक्त बँक ऑफ इंडिया व स्टेट बँकेत ती उपलब्ध आहे .

सभेचे शेवटी मा. जिल्हाधिकारी यांनी निर्यातवाढी संबंधी मार्गदर्शन केले. मा. जिल्हाधिकारी यांनी जिल्हयातील निर्यात होत असलेल्या तांदुळ,लाख इत्यादी उत्पादनांची सांख्यिकी माहीती गोळा करुन सादर करण्याचे निर्देश दिले. त्याशिवाय जिल्हयातील इतर उत्पादने जसे बांबू, वनउत्पादने इत्यादींची निर्यातक्षमता ओळखून त्यांचे निर्यातवाढी बाबत जिल्हयाचा निर्यात कृति आराखडा सादर करण्याचे निर्देश दिले.

सभेचे अखेरीस महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र,गोंदिया.यांनी सभेत उपस्थित अधिकारी व मान्यवरांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले .

6/11/2020
महाव्यवस्थापक,
जिल्हा उद्योग केंद्र,गोंदिया

6/11/20

मा. जिल्हाधिकारी,
गोंदिया.